# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१५

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**वाशिम जिल्हयामध्ये पाऊस न पडल्याने सोयाबीन पिकाचे ८० टक्के नुकसान झाल्याबाबत**

**(१) २५७० (२२-१२-२०१४). श्री. राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हयामध्ये पाऊस न पडल्याने सोयाबीन पिकाचे ८० टक्के नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय?

(२) असल्यास, सदरहू नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या पिकांचे पंचनामे करुन त्यांना आर्थिक मदत देण्यात आली आहे काय,

(३) तसेच उक्त शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथराव खडसे (१०-०२-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे.

वाशिम जिल्हयात खरीप हंगाम सन २०१४-१५ मध्ये २९६५१९ हेक्टर क्षेत्रावर सोयाबीन पिकाची पेरणी झाली असून सोयाबीन पिक फुलोरा ते दाणे भरणेच्या अवस्थेत असताना पाण्याचा ताण पडून उत्पन्नात ६० ते ७० टक्के घट झालेली आहे.

(२) व (३) खरीप हंगाम सन २०१४-१५ मध्ये वाशिम जिल्हयातील ७९३ गांवांची पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी आलेली आहे. त्यानुषंगाने बाधित शेतकऱ्यांना अर्थसहाय्य करण्याकरीता शासनाने पहिल्या टप्प्यात रु.५७.५३ कोटीचा निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. सदर मदतीचे वाटप महसूल यंत्रणेमार्फत चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाशिम जिल्हा परिषद अंतर्गत झालेल्या पद भरतीतील गैरव्यहार**

**(२) २५७२ (२२-१२-२०१४). श्री. राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हा परिषद अंतर्गत झालेल्या पद भरतीतील गैरव्यहार सुरु असल्याची बाब श्री.रविंद्र प्रकाश बनसोड यांनी लेखी स्वरुपात माहे नोव्हेबर मध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, वाशिम यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार ही पद भरती रद्द करुन दोषी अधिकाऱ्यांविरुध्द काय कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे (२०-०२-२०१५) :** (१), (२) होय.
(३) श्री. रविंद्र बनसोड यांनी केलेल्या तक्रारीचे अनुषंगाने चौकशी करण्यात आली. चौकशीमध्ये कोणताही गैरप्रकार झाल्याचे आढळून आले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कारंजा, जि.वाशिम येथील कपाशी पिकांवर लाल्या रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याबाबत**

**(३) २५७५ (२२-१२-२०१४). श्री. राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कारंजा( जि.वाशिम) येथील कपाशी पिकांवर लाल्या रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त नुकसानीचे सर्व्हे करुन शासनाने आर्थिक मदत देण्याबात स्थानिक लोकप्रतिनिधी व शेतक-यांनी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीनुसार सदरहू नुकसानीचा सर्व्हे पूर्ण होऊन आर्थिक मदत देण्यात आली आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१०-०२-२०१५) :**(१) हे खरे नाही. तथापि, खरीप हंगाम २०१४-१५ मध्ये वाशिम जिल्ह्यातील ७९३ गावांची पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी आल्याने शासनाने बाधित शेतकऱ्यांना अर्थसहाय्य देण्याकरिता रु.५७.५३ कोटी इतका निधी उपलब्ध करुन दिलेला असून, सदर मदतीचे वाटप क्षेत्रिय स्तरावरील महसूल यंत्रणेमार्फत चालू आहे.

(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ग्राम सेवा केंद्र सुविधा अद्यापही गावांमध्ये प्राप्त न होण्याबाबत**

**(४) २५८६ (१८-०२-२०१५). श्री. राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यातील ग्राम सेवा केंद्र सुविधा ग्रामीण भागातील नागरिकांसाठी दाखले व इतर काम तात्काळ व्हावे म्हणून सुरु केली होती, तथापि बऱ्याच गावांमधून या सेवा केंद्रातून सेवा प्राप्त होत नसल्याची बाब नुकतीच उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्राम सेवा केंद्र सुविधा अद्यापही गावांमध्ये प्राप्त न होण्याची कारणे काय आहेत,
(३) तात्काळ सर्व गावांमध्ये या केंद्राद्वारे सुविधा पुरविण्याबाबत शासन काय कार्यवाही करीत आहे वा करणार आहे?

**श्रीमती पंकजा मुंडे (२३-०८-२०१५) :**(१) व (२)

राज्यातील सर्व ग्रामपंचायतीतील संग्राम केंद्र हे ग्रामसेवा केंद्र म्हणून कार्यरत आहेत. तथापि खंडीत वीज पुरवठा व काही ग्रामपंचायतीत कोणत्याही प्रकारची इंटरनेट सुविधा उपलब्ध नसल्याने ग्रामस्थांना दाखले व इतर सेवा तात्काळ देण्यास अडचणी निर्माण होत आहेत.
(३) ज्या ग्रामपंचायतीमध्ये उपरोक्त कारणांमुळे सेवा देण्यासाठी अडचणी येत आहेत, अशा ग्रामपंचायतींची डेटा एन्ट्री व संगणकीकृत दाखले जवळच्या वीज अथवा इंटरनेट उपलब्ध असलेल्या ग्रामपंचायतीतून / गावातून काढण्यात येतात तसेच दाखले देण्यासाठी ऑफलाईन पध्दतीची प्रणाली विभागाने विकसित करुन घेतली आहे. अखंडीत वीज पुरवठ्यासाठी योग्य क्षमतेचे युपीएस पुरवठ्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे. तसेच राज्यातील सर्व ग्रामपंचायती या ऑप्टीकल फायबर नेटवर्कद्वारे जोडून प्रत्येक ग्रामपंचायतीला उच्च दर्जाची ब्रॉडबॅण्ड इंटरनेट कनेक्टीव्हीटी देण्याचा केंद्र शासनाचा महत्वाकांक्षी प्रकल्पाच्या अंमलबजावणीला राज्य स्तरावर सामंजस्य करारानामा स्वाक्षरी करुन पुढील कार्यवाहीस सुरुवात झालेली आहे. यामुळे लवकरच राज्यातील सर्व ग्रामपंचायतींना उच्च दर्जा व क्षमतेची इंटरनेट कनेक्टीव्हीटी निःशुल्क उपलब्ध होणार आहे.

---

**जळगांव जिल्ह्यातील स्वस्त धान्य दुकाना मार्फत पुरवठा करण्याकरीताचे निळे रॉकेलचा काळा बाजार विक्री होत असल्याबाबत**

**(५) २६१२ (१५-०१-२०१५). श्री. उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्ह्यातील स्वस्त धान्य दुकाना मार्फत पुरवठा करण्याकरीताच्या अन्नधान्याचे व निळया रॉकेलचा काळा बाजार करुन विक्री होत असल्याचे गत वर्षापासून सातत्याने निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

**श्री.गिरीश बापट (१२-०२-२०१५) :** (१) व (२) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.
तथापि निनावी व्यक्तीच्या दूरध्वनीवरुन भुसावळ शहरात दिनांक १५.९.२०१४ रोजी छापा टाकण्यात आला असता एका रिक्षात ३५० लिटर अवैध केरोसिनचा साठा आढळून आला. सदर प्रकरणी केरोसिनचा साठा व रिक्षा जप्त करण्यात आली व रिक्षा मालक शे.रियाज शेख मासुम यांचेविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. सदर आरोपीस अटक करण्यात आली होती. मात्र त्यांची जामीनावर सुटका झाली. सदर गुन्ह्याचा पुढील तपास चालू आहे. जप्त करण्यात आलेल्या केरोसिनची विल्हेवाट करण्याची कार्यवाही सुरु आहे.
तसेच पारोळा शहरात दि. १६.१२.२०१४ रोजी एका वाहनात ८३ क्विंटल तांदळाच्या गोण्या आढळून आल्या. सदर वाहनाचा मालक समाधान लोटन चौधरी यांचेविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. सदर आरोपीस अटक करण्यात आली होती. मात्र त्यांची जामीनावर सुटका करण्यात झाली. सदर गुन्ह्याचा पुढील तपास चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चाळीसगांव तालुक्यातील पाटणादेवी, वालझिरी व ऋषीपांथा ह्या पर्यटन स्थळांचा विकासाकरीता प्रस्ताव मंजूर करण्याबाबत.

**(६) २६१६ (२३-१२-२०१४). श्री. उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चाळीसगांव (जि.जळगांव) तालुक्यातील पाटणादेवी, वालझिरी व ऋषीपांथा ही पर्यटन स्थळे विकास प्रकल्पांचे प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) नसल्यास, ह्या प्रकल्पांच्या पर्यटन स्थळ विकासाकरिता काय उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०१-२०१५) :**(१) नाही.
(२) व (३) पाटणादेवी हे वनपर्यटन क्षेत्र असल्यामुळे तेथील विकास कामासाठी जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत दरवर्षी काही प्रमाणात तरतूद उपलब्ध करुन देण्यात येते.
सन २०१०-११ या आर्थिक वर्षात नाशिक विभाग विकास कार्यक्रम अंतर्गत पाटणादेवी या पर्यटन स्थळासाठी रु. २.०० कोटी इतकी तरतूद सी.डी. वर्क, मुख्य पुल, लहान पुल, आणि

रस्त्याच्या कामासाठी उपलब्ध करुन देण्यात आली होती.
'क' वर्ग पर्यटन स्थळांसाठी जिल्हास्तरावर व प्रादेशिक पर्यटन विकास योजनेंतर्गत निधीच्या उपलब्धतेनुसार पर्यटन स्थळांच्या विकासासाठी निधी मंजूर केला जातो. याशिवाय तिर्थक्षेत्रांच्या विकासाकरीता ग्रामीण व शहरी भागात अनुक्रमे ग्रामविकास विभाग व नगर विकास विभागामार्फत स्वतंत्र योजना राबविण्यात येते.

---

## राज्यातील अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या प्रलंबित एक रकमी सेवासमाप्ती उपरांत लाभ देण्याबाबतची मागणी

**(७) २६४४ (२२-१२-२०१४). श्री. अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री. संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांच्या शासन प्रलंबित एक रकमी सेवासमाप्ती उपरांत लाभ देण्याच्या संदर्भात तातडीने प्रत्याप्रित करण्याबाबत तसेच त्यांच्या समकक्ष असलेल्या कर्मचा-यांचे उपदान दुर करण्याबाबत तसेच, आयसीडीएसचे खासगीकरण आदी अनेक प्रलंबित मागण्यांसाठी दिनांक ६ जानेवारी, २०१३ रोजी आझाद मैदान येथे आंदोलन करुन बेमुदत संप सुरु केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणता ठोस निर्णय घेतला वा घेण्याचे प्रस्तावित केले आहे,
(३) असल्यास, सदर निर्णयाची अंमबजावणी करण्यासाठी कोणता धडककृती कार्यक्रम हाती घेतला आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे कोणती ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०९-०३-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) अंगणवाडी सेविका, मदतनीस, मिनी अंगणवाडी सेविका यांना सेवानिवृत्तीनंतर एल.आय.सी. योजनेअंतर्गत एकरकमी लाभ देण्याबाबतचा तसेच अंगणवाडी सेविका, मदतनीस, मिनी अंगणवाडी सेविका यांच्या मानधनात अनुक्रमे रु. ९५०/-, ५००/-, ५५०/- इतकी वाढ करण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक ३०.०४.२०१४ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाला केंद्रशासनाच्या पर्यावरण विभागाने अद्याप मान्यता न दिल्याबाबत

**(८) २६७४ (१५-०१-२०१५). श्री. सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यशासनातर्फे अरबी समुद्रात उभारण्यात येणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या आंतरराष्ट्रीय स्मारकाला केंद्रशासनाच्या पर्यावरण विभागाने अद्याप मान्यता दिली नसून हे प्रकरण केंद्रशासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त स्मारकाला केंद्रशासनामार्फत १५ दिवसांत मान्यता देण्यात येईल असे दिनांक ६ नोव्हेंबर, २०१४ रोजी मुंबई दौऱ्या दरम्यान केंद्रिय पर्यावरण मंत्री महोदयांनी जाहीर केले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त स्मारकाला केंद्रिय पर्यावरण विभागाची मान्यता मिळण्यासाठी राज्यशासनाकडे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहे आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०२-२०१५) :** (१) होय.
(२) व (३) नाही, छत्रपती शिवाजी महाराजांच्या आंतरराष्ट्रीय स्मारकाबरोबरच दिनांक ६ नोव्हेंबर, २०१४ रोजीच्या बैठकीमध्ये चर्चा केलेल्या अन्य प्रकल्पांबाबत १५ दिवसांत आढावा बैठक घेण्यात येईल अशी माहिती मा.केंद्रीय पर्यावरण व वन मंत्री महोद्यांनी दिली होती. सीआरझेड- ४ मधून सवलत मिळण्यासाठी पर्यावरण व वन मंत्रालयाच्या दिनांक ६.१.२०११ च्या अधिसूचनेमध्ये सुधारणा करण्यासाठी केंद्र शासनाने दिनांक ११.१२.२०१४ रोजी प्रारुप अधिसूचना प्रसिध्द केली असून जनतेकडून हरकती व सुचना मागविल्या आहेत. त्यानुसार महाराष्ट्र सागरी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण (MCZMA) मार्फत केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाकडे दिनांक ५.१२.२०१४ रोजी पर्यावरणावर होणा-या परिणामांचा अभ्यास (EIA), पर्यावरणावर होणा-या परिणामांची काळजी घेण्यासाठी वेगवेगळ्या मार्गाचा अभ्यास (EMP)व आपत्कालिन परिस्थितीत करावयाच्या वेगवेगळ्या उपाययोजना (DMP) सह प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. तसेच केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयास दिनांक २९.०१.२०१५ रोजी सादरीकरण करण्यात आले आहे. केंद्र शासनाची अंतिम अधिसूचना प्रसिध्द झाल्यानंतर केंद्र शासनाच्या पर्यावरण मंत्रालयाकडून अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्यासाठी मान्यता प्राप्त होणे अपेक्षित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट तालुक्यातील कॅनलचे लाईनिंग न केल्याचे ह्या भागातील शेतापर्यंत प्रकल्पाचे पाणी पोहचत नसल्याबाबत

**(९) २६९४ (२२-१२-२०१४). श्री. समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट तालुक्यातील बोर, धाम, पोथरा, लालनाला व लोअरवणा प्रकल्पाअंतर्गत येणा-या कॅनलचे लाईनिंग न केल्याचे ह्या भागातील शेवटच्या शेतक-याच्या शेतापर्यंत प्रकल्पाचे पाणी पोहचत नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१३-०३-२०१५)** :(१) अंशतः खरे आहे.
(२) व (३) बोर प्रकल्पाकरिता विस्तार व सुधारणा कार्यक्रमाअंतर्गत निधी मंजूर असून त्यानुसार कामे सुरु आहेत.

धाम प्रकल्पाकरिता विस्तार व सुधारणा कार्यक्रमाअंतर्गत शासनास प्राप्त झालेल्या प्रस्तावावर नियोजन विभागाने उपस्थित केलेल्या शे-यांबाबत पूर्तता क्षेत्रिय कार्यालयाकडून सुरु आहे.

पोथरा प्रकल्पाकरिता विस्तार व सुधारणाच्या कामाची तरतूद प्रकल्पाच्या चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावात अंतर्भूत आहे. सदर प्रस्ताव राज्य तांत्रिक सल्लागार समितीस सादर झाला असून मंजूरीस्तव पाठपूरावा सुरु आहे.

लाल नाला प्रकलाच्या कालवा कि.मी.१ ते ६.९ कि.मी. पर्यंतच्या भागातील संबंधित भुधारकांना सिंचनाचे पाणी पोहचत असून सन २००७-०८ पासुन सिंचन सुरु आहे.

निम्न वणा प्रकल्पातून पाणी आरक्षणामुळे होणा-या सिंचन कपातीचे पुर्नस्थापना खर्चाकरीता प्राप्त निधीतून या कालव्याला अस्तरीकरण करण्याचा प्रस्ताव क्षेत्रिय स्तरावर तयार करणे सुरु आहे.

---

**वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट तालुक्यातील आजनसरा बॅरेज उपसा सिंचन प्रकल्प प्रस्तावित करण्याबाबत**

**(१०) २६९७ (१५-०१-२०१५). श्री. समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वर्धा जिल्ह्यातील हिगणघाट तालुक्यातील क्षेत्रामध्ये कोरडवाहू जमीन सिंचनाखाली यावी याकरिता आजनसरा बॅरेज उपसा सचिन प्रकल्प वर्धा नदीवर आजनसरा गावाजवळ प्रस्तावित करण्यात आला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पास शासनाने १३ एप्रिल, २००० ला सन १९९६-९७ च्या दर सुचीनुसार १५८२१.७३ लक्ष रुपयांची मुळ प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यामुळे प्रशासकीय मान्यतेनंतर ५ वर्षे निधी प्राप्त न झाल्याने ती व्यपगत झाली व नव्याने २०८४२.२७ लक्ष रुपये सन २००६ ला नव्याने प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू मंजूर प्रकल्पास अद्यापपर्यंत निधी उपलब्ध करुन दिला नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकल्पास मंजुरी असुन सुध्दा निधी उपलब्ध करुन न देण्यामागील कारणे काय आहेत व सदरील निधी लवकरात लवकर उपलब्ध देण्याबाबत शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-०२-२०१५) :** (१) होय.
(२) होय.
(३) होय.
(४) हे खरे नाही.
सदर प्रकल्पास प्राप्त तरतूद व खर्चाबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

(रु.लाखात)

| वर्ष | तरतुद | प्राप्त | खर्च |
|---|---|---|---|
| २०१०-११ | २६२.०० | २६२.०० | ०.० |
| २०११-१२ | ०.०० | ०.०० | २३०.३९ |
| २०१२-१३ | २१.१० | १६.६६ | ०.० |
| २०१३-१४ | २००.०० | ०.०० | ०.० |
| २०१४-१५ | १०.०० | ६.०० | ०.० |

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वर्धा शहर व हिंगणघाट तालुक्यातील एसटीच्या अपु-या नादूरुस्त बस सेवेबाबत.**

**(११) २७०० (१५-०१-२०१५). श्री. समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा शहर व हिंगणघाट तालुक्यातील नागरिकांना अपु-या नादूरुस्त एसटी बस सेवेमुळे त्रास सहन करावा लागत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ च्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वर्धा शहर व हिंगणघाट तालुक्यातील बस आगाराला नविन छोटया व मोठया बसेंस देण्याबाबत शासनास्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. दिवाकर रावते (१२-०२-२०१५) :** (१) नाही.
(२) सन २०१२-१३ व २०१३-२०१४ एकूण ५७ नवीन बसेस वर्धा विभागास दिल्या असून त्यातील वर्धा आगारास २९ व हिंगणघाट आगारास १२ अशा ४१ नवीन बसेस देण्यात आल्या आहेत. वर्धा विभागाच्या सन २०१२-१३ ते जानेवारी, २०१५ अखेर एकूण १०७ बसेस मोडीत काढल्या असून त्यातील वर्धा आगाराच्या ३७ व हिंगणघाट आगाराच्या ३० अशा ६७ बसेसचा

समावेश आहे. वर्धा आगार व हिंगणघाट आगाराच्या रा.प. बसेसचे सरासरी आयुर्मान अनुक्रमे ३.९६ व ४.१८ वर्षे एवढे आहे. तर वर्धा विभागातील रा.प. बसेसचे सरासरी आयुर्मान ४.७१ वर्षे एवढे आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसई तालुक्यातील अर्नाळा जिल्ह्यात जाण्यासाठी स्कायवॉक बांधुन मिळणेबाबत**

**(१२) २७०२ (२३-१२-२०१४). श्री. हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई तालुक्यातील अर्नाळा किल्ल्यात जाण्यासाठी स्कायवॉक बांधून मिळण्यासाठीची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी निवेदनाद्वारे मा.मुख्यमंत्री महोदयांना केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली आहे, त्याबाबत सद्य:स्थिती काय आहे,

(३) मा.उप सचिव, पर्यटन ह्यांनी दिनांक ०९/०८/१२ रोजीच्या पत्रान्वये अर्नाळा किल्ल्यात जाण्यासाठी स्कायवॉक बांधण्यासाठीचा अहवाल मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे मागितला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर अहवाल देण्यात आला आहे काय, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०२-२०१५) :**(१) होय.

(२) जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडून अहवाल मागविण्यात आला आहे.

(३) होय.

(४) नाही. तथापि, जिल्हाधिकारी, ठाणे यांनी सादर केलेल्या अंतरिम अहवालानुसार अधिक्षक, अभियंता, सा.बां.मंडळ, ठाणे यांना वसई तालुक्यातील अर्नाळा किल्ल्यात जाण्यासाठी बांधण्यात येणा-या स्कायवॉक बांधणेबाबतच्या स्थळाच्या जागेच्या मालकीसह सविस्तर प्रस्ताव व अंदाजपत्रक सादर करण्याबाबत तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरिटाइम बोर्ड, मुंबई व संचालक, पुरातत्व विभाग, मुंबई यांना सदर कामाबाबत कार्यवाही करुन अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे. तसेच मेरिटाइम बोर्ड, पुरातत्व विभाग, सागरी नियंत्रण कक्ष व पर्यावरण विभाग इ. विभागाकडून अहवाल /अभिप्राय प्राप्त व्हावयाचे आहेत.

---

**वसई तालुक्यातील मौजे आचोळे येथील मंजूर न्यायालयीन**
**इमारत व निवास्थानाच्या कामांना निधी मिळणेबाबत**

**(१३) २७०४ (१५-०१-२०१५). श्री. हितेंद्र ठाकूर (वसई), श्री. क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री. विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे आचोळे (ता. वसई, जि. ठाणे) येथील मंजूर न्यायालयीन इमारत व निवासस्थानांचा कामांना त्वरीत निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी दिनांक १६ ऑगस्ट, २०१३ रोजीच्या निवेदनाद्वारे स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रस्तावाची सद्य:स्थिती काय आहे,
(३) प्रत्यक्ष काम सुरु होण्यास काय अडचणी आहेत शासनाची भुमिका काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०२-२०१५) :** (१) होय.
(२) वसई, जि.ठाणे येथील न्यायालयीन इमारत बांधण्याबाबत अद्यावत दरसूचीवर आधारित प्रस्ताव फेर सादर करण्यास, मा.उच्च न्यायालय यंना कळविण्यात आले असून अद्याप सुधारित प्रस्ताव शासनास अप्राप्त आहे.

वसई, जि.ठाणे येथे न्यायधिशांसाठी १२ निवासस्थाने बांधण्याबाबत मा.उच्च न्यायालय यांच्या दि. ३० मे, २०१३ च्या पत्रान्वये रु. ५,२७,३६,४८७/- इतक्या अंदाजित खर्चाचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून त्याअनुषंगाने वित्त विभागाने उपस्थित केलेल्या मुद्यांची माहिती दि. १६/१/२०१५ च्या पत्रान्वये प्राप्त झाली असून त्यावर विहित पध्दतीने मान्यता घेण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) वसई, जि.ठाणे येथील न्यायालयीन इमारतीबाबतचा सुधारित प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही त्वरीत करण्यात येईल.

तसेच न्यायाधीश निवासस्थानाबाबत जिल्हा व सत्र न्यायाधीश, ठाणे यांचेकडून वित्त विभागाने उपस्थित केलेली माहिती शासनास प्राप्त झाली असून त्यावर विहित मार्गाने प्रशासकीय मान्यता घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**चिखलडोंगरे ता. वसई येथे खाडी किना-यांवर जेटी बांधून मिळणेबाबत**

**(१४) २७०७ (२७-०१-२०१५). श्री. हितेंद्र ठाकूर (वसई), श्री. क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिखलडोंगरे (ता.वसई) येथे खाडी किना-यांवर जेटी बांधून मिळणेबाबत लोकप्रतिनिधी यांनी मा.मंत्री मत्स्य व्यवसाय यांना दिनांक २४ फेब्रुवारी, २०११ रोजी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,जेटी बाधण्याच्या कामास सुरुवात न होण्याची कारणे काय आहेत ,
(३) असल्यास, सदरहू काम शासनाने तत्परतेने हाती घेऊन पूर्ण करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१२-०२-२०१५) :**(१) होय.
(२) वसई तालुक्यातील चिखलडोंगरे येथील जेट्टीचे बांधकाम सन २०११-१२ च्या जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून पूर्ण करण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत  नाही.

---

**एमएमआरडीएने वसई तालुक्यासाठी मंजूर केलेल्या कामांसाठी आर्थिक तरतूद केली नसल्याबाबत**

**(१५) २७१५ (२३-१२-२०१४). श्री. क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) एमएमआरडीएने वसई तालुक्यासाठी मंजूर केलेल्या अनेक कामासांठी अद्यापपर्यंत आर्थिक तरतूद करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत व सदर आर्थिक तरतूद किती मुदतीत करण्यात येईल अशी अपेक्षा आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०३-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राजीव गांधी ग्रामीण निवास योजनेतून पालघर जिल्ह्याला अपूरा निधी मिळाल्याबाबत**

**(१६) २७४९ (२२-१२-२०१४). श्री. क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१२-१३ व २०१३-१४ या २ वर्षाकरीता ठाणे जिल्हापरिषदेला राजीव गांधी ग्रामीण निवारा योजनेअंतर्गत एकूण किती निधी प्राप्त झाला.
(२) सदरहू प्राप्त झालेल्या निधीतून ठाणे आणि पालघर जिल्ह्यातील एकूण किती लाभार्थींना घरकुल योजनेचा फायदा मिळाला
(३) असल्यास, ठाणे जिल्हा परिषदेला सदरहू योजनेंतर्गत प्राप्त झालेल्य सुमारे २८ कोटी रुपयांचा निधी पुन्हा राज्य शासनाकडे वर्ग करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, गरजू लाभार्थींना या योजनेतून घरकुले न देता २८ कोटींचा निधी परत शासनाकडे वर्ग करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

**श्री. प्रकाश मेहता (१२-०३-२०१५) :** (१) सन २०१२-२०१३-१४ या २ वर्षाकरीता प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद ठाणे यांना राजीव गांधी ग्रामीण निवारा

योजनेअंतर्गत एकूण रु. ३२९९.८७ लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.
(२) सदर निधीमधून ठाणे जिल्ह्यात १८ व पालघर जिल्ह्यात ७२६ अश्या एकूण ७४४ लाभार्थ्यांना घरकुल योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) घरकुलाचा लाभ देण्यासाठी प्रतीक्षा यादीत लाभार्थी शिल्लक नसल्याने ठाणे जिल्हा परिषदेकडे शिल्लक असलेला निधी व त्यावरील जमा व्याज मिळून एकूण रु. २९,१०,३१,१७०/- निधी शासनास परत करण्यात आला आहे.

---

**पाणजू बेट (ता.वसई, जि.पालघर) येथे प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी वन विभागाची परवानगी मिळण्याबाबत**

**(१७) २७५८ (२२-१२-२०१४). श्री. क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री. विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाणजू बेट (ता.वसई, जि.पालघर) येथे प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी वन विभागाची परवानगी मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मंत्री महोदयांना दिनांक २० सप्टेंबर, २०१० रोजी पत्रान्वये कळविले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्या अनुषंगाने शासनाने दिनांक ८ नोव्हेंबर, २०१० रोजी वा त्यासुमारास लोकप्रतिनिधी यांना पत्राद्वारे कळविले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र उभारणीसाठी वन विभागाची परवानगी न मिळण्यास होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१०-०२-२०१५) :** (१), (२) व (३) स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि.२०/९/२०१० रोजीच्या पत्रान्वये तत्कालिन मा.मंत्री (वने) यांना याअनुषंगाने कळविले आहे. तथापि, पाणजू बेट, ता.वसई, जि.पालघर येथे वन विभागाच्या ताब्यातील वन जमिन नाही. सदर परिसरात कांदळवनाचे क्षेत्र असल्याने प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी जमिनीची आवश्यकता असल्यास वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत केंद्र शासनाची पूर्व अनुमती प्राप्त करुन घेणे तसेच मा.मुंबई उच्च न्यायालयाची परवानगी प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. प्रकल्प यंत्रणेकेकडून वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत वन जमिन वळतीकरणाचा प्रस्ताव वन विभागास प्राप्त झालेला नाही.

---

**राज्याच्या सध्याच्या आर्थिक स्थितीविषयी श्वेतपत्रिका काढण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(१८) २८१० (२२-१२-२०१४). श्री. सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री. तुकाराम काते (अणुशक्ती नगर), डॉ. बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री. सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याची सध्याची आर्थिक स्थिती, स्वीकृत दायित्व, भविष्यातील वाटचाल आणि खर्च अधिक पारदर्शक व कार्यक्षमरितीने करण्यासाठी आवश्यक उपाययोजना विशद करणारी

श्वेतपत्रिका काढण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यांसदर्भात शासनाने निर्णय घेतला आहे काय तसेच या संदर्भातील श्वेतपत्रिका काढण्यात आली आहे काय, असल्यास तीचे स्वरुप काय आहे,
(३) अद्यापही याप्रकरणी निर्णय होऊन श्वेतपत्रिका काढण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-०१-२०१५) :** (१) होय.
(२) व (३) याबाबतची माहिती एकत्रित / संकलित करण्यात येत आहे.

---

**कोल्हापूर जिल्ह्याचे माजी शहरप्रमुख जितेंद्र सणगर यांचे अपहरण करुन खून केल्याबाबत**

**(१९) २८२९ (१५.१.२०१५). डॉ. सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री. राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्याचे माजी शहरप्रमुख जितेंद्र सणगर यांचे दिनांक १५ जानेवारी, २०१४ रोजीच्या सुमारास अपहरण करुन खून केल्यासंदर्भात अद्यापर्यंत एकाही आरोपींला अटक करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणातील आरोपी शोधण्यास दोन वर्षाचा कालावधी लागण्याची कारणे काय आहेत,
(३) कारवाई केली असल्यास सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-३-२०१५) :** (१), (२) व (३) प्रश्नात नमूद जितेंद्र सणगर यांचे प्रेत दि. २८/०१/२०१२ रोजी हातकणंगले तालुकयातील संभापूर गावचे हद्दीतील शेतात आढळून आल्याने शिरोळी एमआयडीसी पोलीस ठाणे मध्ये गु.र.नं. ००/१२ भा.दं.वि. कलम ३०२, ३६४, २०१ प्रमाणे दि.२८/०१/१२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरहू गुन्हा उघडकीस आणण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करुनही अद्याप आरोपीचा शोध लागलेला नाही. त्यामुळे सदरहू गुन्हा उघडकीस येवू पर्यंत कायमस्वरुपी तपासावर राहणेकरीता प्रथम वर्ग दंडाधिकारी, वडगाव यांचे न्यायालयात गुन्ह्याचा 'अ' फायनल समरी दि.२१/११/१३ रोजी मंजूरी झाली आहे.

---

**पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समितीचे**
**अध्यक्ष पद सन २००९ पासून रिक्त असल्याबाबत**

**(२०) २८३९ (१५-०१-२०१५). डॉ. सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री. राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समितीचे सन २००९ पासून अध्यक्ष पद रिक्त आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे अंबाबाई मंदिर आणि जोतिबा मंदिराबरोबर सुमारे ३,०६७ मंदिराच्या व्यवस्थापनाचा अतिरिक्त भार जिल्हाधिकारी यांचेवर आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, त्यांचे स्वरुप काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०२-२०१५) :** (१) देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर या समितीचे अध्यक्ष पद जून, २०१० पासून रिक्त आहे.
(२) अध्यक्ष, देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर या पदाचा अतिरिक्त कार्यभार मार्च, २०१२ पासून जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडे सोपविण्यात आलेला आहे.
(३) यासंदर्भात शासनाने अद्‌याप निर्णय घेतलेला नाही.

---

**रामलिंग व धुळोबा (ता.हातकणंगले जि.कोल्हापूर) येथील**
**धार्मिक प्रेक्षणिय स्थळांच्या विकास प्रस्तावाबाबत**

**(२१) २८४० (२२-१२-२०१४). डॉ. सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री. राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रामलिंग धुळोबा (ता.हातकणंगले जि.कोल्हापूर) येथील धार्मिक प्रेक्षणिय स्थळांच्या विकासाचा प्रस्ताव गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रस्तावाला मंजूरी देण्यासंदर्भात विलंब लागण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, प्रस्तावाला शासन मंजूरी दिली आहे काय,
(४) असल्यास, या मंजूरीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे?

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-०२-२०१५) :** (१) हे अंशतः खरे आहे. श्री.रामलिंग देवस्थान व श्री.धुळोबा देवस्थान या देवस्थानांना "ब" वर्ग दर्जा देण्याचा प्रस्ताव ऑगस्ट, २०१३ मध्ये शासनास प्राप्त झाला आहे.
(२), (३) व (४) सदर दोन्ही देवस्थानांस "ब" वर्ग दर्जा देण्याबाबतच्या प्रस्तावात काही त्रुटी आढळून आल्या आहेत. त्यानुसार जिल्हा परिषद, कोल्हापूर यांना पोलीस अधिक्षकांचे सुधारीत प्रमाणपत्र, तीर्थक्षेत्रास क वर्ग दर्जा असल्याचा पुरावा, बांधकाम करण्यासाठी वनविभागाचे ना हरकत प्रमाणपत्र व इतर संबंधीत कागदपत्र या विभागाच्या दिनांक २४ सप्टेंबर, २०१३ व १९ नोव्हेंबर २०१४ च्या पत्रान्वये शासनास सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे. सदर कागदपत्रांची पूर्तता झाल्यावर प्रस्तुत तिर्थक्षेत्रांस "ब" वर्ग दर्जा देण्यासाठीचा प्रस्ताव राज्य निकष समितीच्या विचारार्थ सादर करण्यात येईल.

---

**मुंबई शहरातील वाडीबंदर येथे चोराला पकडण्याचा प्रयत्न करताना पोलीस नाईक श्री. अजय गावंडे यांचा मृत्यू झाल्याबाबत**

**(२२) २८५२ (१५-०१-५०१५). श्री. तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील वाडीबंदर येथील निवासी इमारतीत घुसलेल्या चोराला पकडण्याचा प्रयत्न करताना डोंगरी पोलीस ठाण्याचे पोलीस नाईक श्री. अजय गावंडे यांचा चोराने डोक्यात लाकडी फळी मारल्याने दिनांक १६ नोव्हेंबर, २०१४ रोजी मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चोराला पकडण्यासाठी प्राणाची बाजी लावणाऱ्या श्री.गावंडे यांना मरणोत्तर शौर्यपदक देण्याची शिफारस पोलीसांमार्फत शासनाकडे पाठवली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने निर्णय घेतला आहे काय, असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०३-२०१५) :**(१) होय.

(२) होय.

(३) श्री.अजय गावंडे, पोलीस नाईक, मुंबई शहर यांना मरणोत्तर राष्ट्रपती पोलीस शौयपदक प्रदान करण्याची शिफारस गृह मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना दिनांक २७.०२.२०१५ च्या पत्रान्वये करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिंधुदुर्ग जिल्हयातील देवगड बंदरात जेटी प्रकल्पाचे काम निधी अभावी प्रलंबित असल्याबाबत**

**(२३) २८८७ (१५-०१-२०१५). श्री. वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हयातील देवगड बंदरात जेटी प्रकल्पाचे काम निधी अभावी प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत ३ कोटीचा प्रस्ताव गृह विभागाकडे पाठवला असूनही अद्यापही त्यांस मंजूरी मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मंजूरी न देण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, या संदर्भात शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) यासंदर्भात शासनाचे धोरण काय आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०३-२०१५) :** (१) हे खरे नाही, देवगड बंदरातील जेटी समुद्राच्या लाटांच्या मा-याने नादुरुस्त झाली होती. त्यामुळे जेटीच्या व पोचरस्त्याच्या दुरुस्तीचे काम हाती घेवून ते मे, २०१४ मध्ये पूर्ण करण्यात आले.
(२) ते (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई विद्यापीठाच्या अखत्यारित येणाऱ्या महाविद्यालयांची संलग्नता नसल्याबाबत**

**(२४) २८९५ (२२-१२-२०१४). श्री. रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या अखत्यारितीत येणाऱ्या ६७ महाविद्यालयांपैकी सुमारे ५० हून अधिक महाविद्यालयांकडे मुंबई विद्यापीठाची गेल्या ४ वर्षापासून संलग्नता नसल्याची बाब नुकतीच निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) तसेच यासंदर्भात उच्च व तंत्रशिक्षण संचालक यांनी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु यांना पत्र पाठवून खुलासा विचारला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (२३-०२-२०१५) :**(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वाडा (जि.ठाणे) येथील शिवाई प्रबोधिनी या संस्थेच्या विज्ञान विद्या शाखेच्या महाविद्यालयास शासकीय अनुदान देण्याबाबत**

**(२५) २८९६ (२२-१२-२०१४). श्री. रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.ठाणे) येथील शिवाई प्रबोधिनी या संस्थेच्या विज्ञान विद्या शाखेच्या महाविद्यालयास दिनांक २ जानेवारी, २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच सदर संस्थेने शासकीय अनुदान देण्याबाबत मागील २ वर्षाच्या काळात मा.उच्च शिक्षण मंत्री, सचिव यांचेकडे निवेदने सादर करुन मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने सदर संस्थेच्या विज्ञान महाविद्यालयास शासकीय अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असल्यास, साधारणत: केंव्हापर्यंत अनुदान देणे अपेक्षित आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. विनोद तावडे (२५-०२-२०१५) :**(१) नाही.
(२) होय.
(३) व (४) शासनाच्या तालुक्यातील एकमेव विद्याशाखा महाविद्यालय अनुदानावर आणण्याच्या धोरणानुसार विहित प्रक्रिया अवलंबून वाडा तालुकयातील विज्ञान विद्याशाखेस देय असलेले अनुदान शिक्षक संचलित शिक्षण संस्था, वाडा या संस्थेच्या महाविद्यालयास दि.२.१.२०१३ च्या आदेशान्वये मंजूर करण्यात आलेले आहे.

---

**भिवंडी निजामपूरा महानगरपालिकेतील अनधिकृत व धोकादायक बांधकाम पाडण्याबाबत.**

**(२६) २८९८ (२३-१२-२०१४). श्री. रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी निजामपुरा शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती क्र. ३ पदमानगर सोनापाडा येथील घर क्र. ३१३ / १ मधील अनधिकृत व धोकादायक बांधकाम पाडण्यासाठी मा. आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी तक्रार दाखल केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत भिवंडी निजामपूरा महानगरपालिकेतील आयुक्त व संबंधित अधिकारी यांनी चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत आढळून आलेल्या दोषीवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०१५) :** (१) व (२) होय.
(३) मौजे कामतघर, सोनारपाडा येथील श्री. कैलास गंगाराम भोई व श्री.निशांत गंगाराम भोई यांनी सर्वे नं. ४८ /१२, या जागेतील घर नं. ३१३/१ या अस्तित्वामधील घराच्या तळ मजल्यावरील पहिल्या मजल्याकरीता विट भिंतींचे काम करुन त्यावर पत्रा छप्परांचे अनधिकृत बांधकाम केले. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २६५ अ (३) नुसार धोकादायक इमारतीस बांधकाम सुस्थित प्रमाणपत्र सादर करणे बाबत नोटिस देण्यात आली आहे.

सदर अनधिकृत बांधकामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २६० (१), (२), ४७८ (१) व महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ५२ ते ५५ अन्वये नोटीस बजावणेत आलेली आहे.

तसेच दिनांक ०८.०१.२०१५ अन्वये भिवंडी शहर पोलिस स्टेशन मध्ये ६ /२०१५ अन्वये एफ.आय.आर. दाखल करण्यात आलेला आहे. पोलिस स्टेशनकडून बंदोबस्त मिळाल्यानंतर सदर अनाधिकृत बांधकामावर निष्कसित करण्याची कारवाई करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भिवंडी (जि. ठाणे) येथील शिधावाटप व स्वस्त धान्याची दुकाने शहरी भागात सुरु असल्याने ग्रामीण भागातील नागरिक यापासुन वंचित असल्याबाबत**

**(२७) २९०३ (१५-०१-२०१५). श्री. शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी जि. ठाणे येथील ग्रामीण भागात शिधावाटप व स्वस्त धान्याची दुकाने तहसिलदार कार्यालयांतर्गत सुरु असतांना २९ गावांचा समावेश २० वर्षापासुन ३७ फ कार्यालयात केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण पुरवठा शाखेअंतर्गत २३९ गावात १५५ शिधावाटपाची दुकाने असुन २९ गावातील शिधावाटपाची दुकाने शहरी भागात सुरु असल्याने ग्रामीण भागातील आदिवासी तसेच सर्वसामान्य नागरिक यापासुन वंचित आहेत हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुसार संबंधित अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत ?

**श्री.गिरीश बापट (१२-०२-२०१५) :** (१) होय,

(२) हे खरे नाही.

सदर २९ गावांमध्येच ३१ शिधावाटप दुकाने कार्यरत असून, या शिधावाटप दुकानांमार्फत प्रत्येक महिन्यात या गावांतील शिधापत्रिकाधारकांना नियमाप्रमाणे अन्नधान्य व केरोसीन वाटप केले जाते.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भिवंडी (जि.ठाणे) येथील ठाणगे आळीत मल-मूत्रयुक्त पाणी पुरवठा होत असल्याबाबत.**

**(२८) २९१० (१५-०१-२०१५). श्री. शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) येथील ठाणगे आळीत मल-मूत्रयुक्त पाणी पुरवठा होत असल्याने तेथील नागरिकांना उलट्या-जुलाब तसेच साथीच्या आजाराची लागण झाली असल्याचे माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर, २०१४ वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच या भागात पाणीपुरवठ्याची वेळ बदलण्याचीही प्रचंड मागणी करूनही पालिकेकडून दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात चौकशी केली आहे काय, त्यात काय आढहून आले,

(४) चौकशीनुसार संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. बबनराव लोणीकर (१३-०३-२०१५) :**(१) ऑक्टोबर-नोव्हेंबर, २०१४ वा त्या सुमारास दूषित पाणी पुरवठा होत असल्याचे आढळल्यावर गळती शोधून जलवाहीनीची तातडीने दुरुस्ती करण्यात आली. मात्र, या सुमारास साथीच्या आजाराची लागण झाल्याचे आढळून आले नाही.

(२) हे खरे नाही.

या भागातून पाण्याची वेळ बदलण्याची मागणी नागरीकांकडून करण्यात आली होती. तथापि, या भागात पाण्याची वेळ बदलल्यास भिवंडी शहरामध्ये वेळापत्रकानुसार झोन निहाय पाणी पुरवठ्यावर त्याचा विपरित परिणाम होण्याची तांत्रिक अडचण लक्षात घेता पाण्याची वेळ बदलणे शक्य नसल्याचे परिसरातील नागरीकांचे निदर्शनास आणण्यात आले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अलिबाग तालुक्यातील (जि. रायगड) किहिम आणि आवास समुद्रकिनारी तेलाचा तवंग आल्यामुळे मस्त्योत्पादनावर मोठया प्रमाणात झालेला परिणाम**

**(२९) २९१५ (२७-०१-२०१५). श्री. भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील किहिम आणि आवास समुद्रकिनारी तेलाचा तवंग आल्याचे नुकतेच माहे नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तेलाचा तवंग आल्यामुळे मस्त्योत्पादनावरही मोठया प्रमाणात परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गेल्या चार वर्षात तेल तवंग समुद्र किना-यावर वाहून येण्याची ही तिसरी घटना आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने पाहणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५) तदनुसार पुढे कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. एकनाथराव खडसे (१२-०२-२०१५) :** (१) नाही.

(२) नाही.

(३) नाही.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) दिवाळी सणानिमित भेसळयुक्त पदार्थावर नियंत्रण ठेवण्यासाठी राबवलेल्या मोहिमेबाबत**

**(३०) २९१७ (१५-०१-२०१५). श्री. भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) दिवाळी सणानिमित भेसळयुक्त पदार्थावर नियंत्रण ठेवण्यासाठी राबविलेल्या मोहिमेत आतापर्यंत सुमारे दीड कोटी रुपयांची भेसळयुक्त मिठाई जप्त केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक ५ ऑक्टोबरपासून राबविण्यात आलेल्या या मोहिमेत आटा, रवा, मैदा, बेसन, खाद्यतेल, वनस्पती घी, चॉकलेट व बेकरी उत्पादने तसचे सुकामेवा असे राज्यभरातून अधिक नमुने गोळा केले आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
तदनुसार दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष बापट (१२-०२-२०१५)** :(१) सदर मोहिमेअंतर्गत अन्न व औषध प्रशासनातर्फे रु.१,५१,६२,०७७/- एवढ या किंमतीचा साठा जप्त करण्यात आला.
(२) होय, अन्न व औषध प्रशासनाने १,६९५ नमुने भेसळीच्या संशयावरुन विश्लेषणासाठी घेतले आहेत.
(३) होय, कमी दर्जाचे आढळून आलेल्या नमुन्यापैकी २ प्रकरणात तडजोड होवून रु.२०,०००/- दंड आकारण्यात आला. कमी दर्जाच्या १७० प्रकरणी व १६ मिथ्याछाप प्रकरणी तपास सुरु असून अन्न सुरक्षा व मानके कायद्यानुसार न्यायनिर्णयाची प्रक्रिया अन्न व औषध प्रशासनामार्फत करण्यात येत आहे.

असुरक्षित नमुन्यांच्या प्रकरणी अन्न सुरक्षा व मानके कायद्यानुसार विविध न्यायालयात खटला दाखल करण्याची कारवाई अन्न व औषध प्रशासनामार्फत करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत  नाही.

---

**राज्यातील औद्योगिक क्षेत्राच्या समस्या सोडविण्याबाबत**

**(३१) २९४४ (२२-१२-२०१४). श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील औद्योगिक क्षेत्राच्या समस्या सोडविण्यासाठी उद्योजकांच्या शिष्टमंडळाने दिनांक १९ नोव्हेंबर,२०१४ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांची भेट घेवून मागणी केली होती, हेही खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील औद्योगिक क्षेत्राच्या समस्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे, व त्यानुसार आतापर्यंत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(३) राज्यातील उद्योगवाढीला चालना मिळावी याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०७-०३-२०१५) :** (१), (२) व (३) होय. कार्यकारी संचालक, All India Association of Industries यांनी दिनांक ०६/११/२०१४ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांना पाठविलेल्या पत्रामध्ये महानगरपालिका क्षेत्रामध्ये सुरु असलेला स्थानिक संस्था कर रद्द करण्याची विनंती केलेली असून, सदर बाब नगर विकास विभागाच्या विचाराधीन आहे.

---

**मौजे सुस्ते-तारापूर (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथील भिमा नदीच्या पात्रात बंधारा बांधण्याच्या प्रस्तावास मान्यता न दिल्याबाबत**

**(३२) २९४८ (१५-०१-२०१५). श्री. बबनराव शिंदे (माढा), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सुस्ते-तारापूर (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथील भिमा नदीच्या पात्रात बंधारा बांधण्यास सन २००९ मध्ये मंजूरी मिळूनही सदर प्रस्तावास अद्याप मान्यता देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदर बंधाऱ्याचे काम तातडीने करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१२-०३-२०१५) :** (१) सदर बंधारा प्रकल्प शासन निर्णय क्र. कोपबकं/४८७/१२८६/२१८/८७/ लपा.१, दि.१४-०२-१९८९ अन्वये रु.८७.२४ लक्ष इतक्या किंमतीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती.

(२) व (३) प्रशासकीय मान्यतेनुसार प्रकल्पाचा (को.प.बंधा-याचा) पाणीसाठा ४८०७ सघमी. आहे. तथापी या बंधा-याचे खालील बाजूस अस्तित्वात असणा-या पुळूज बंधा-याचे पाणी साठ्यामुळे सुस्ते तारापूर बंधा-याची जागा जलमग्न होते व या ठिकाणी सुस्ते तारापूर बंधारा बांधल्यास त्याद्वारे निव्वळ पाणीसाठा १४५३ सघमी होत आहे व त्याद्वारे ४५८ सिंचनक्षेत्र निर्माण होऊ शकते. यानुसार प्रकल्पाचा सुधारित प्रशासकीय मान्यता अहवाल तयार केला असता त्याची सन २००९-२०१० दरसूचीनुसार सुप्रमा किंमत ११५०.४८ लक्ष येत असून त्यांचे लाभव्यय गुणोत्तर व प्रतिसघमी किंमत प्रचलित मापदंडात बसत नसल्याने या प्रकल्पास सुप्रमा मिळू शकली नाही व त्यामुळे काम अद्याप हाती घेता आले नाही.

---

**पेल्हार (ता.वसई, जि.पालघर) येथील जिल्हापरिषदेच्या प्राथमिक शाळेमधील विद्यार्थी प्राथमिक सुविधावाचून वंचित असल्याबाबत**

**(३३) २९५९ (२२-१२-२०१४). श्री. विलास तरे (बोईसर), श्री. क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई तालुक्यातील (जि.पालघर) नालासोपारा पूर्वेकडील वसई-विरार शहर नगरपालिकेच्या हद्दीत पेल्हार येथे जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेमधील विद्यार्थी आजही प्राथमिक सुविधा वाचून वंचित असून त्यांना अशुद्ध पाणी प्यावे लागत आहे तसेच तेथील विद्यार्थ्यांना शालेय युनिफॉर्म व बूटसुद्धा देण्यात आलेले नाहीत, हे खरे आहे काय,
(२) सदरहू शाळेत प्राथमिक सुविधा नसल्यामुळे तेथे शिक्षण घेणा-या सुमारे २५० हून अधिक मुलांना आजही अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय युनिफॉर्म, बूट तसेच मुलभूत सुविधा, शुद्ध पाणी न पुरविण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२३-०२-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही. वसई - विरार शहर नगरपालिकेच्या पेल्हार हद्दीत तीन शाळा येतात १) पेल्हार गाव, २) पेल्हारपाडा, ३) पेल्हार हायवे या तीनही शाळांना गणवेश वाटपांसाठी अनुक्रमे रु. ६३,२००/-, ३०,८००/- व १,०३,२००/- याप्रमाणे निधी अदा केला असून या विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करण्यात आले आहे. तसेच बूट वाटप करण्यात आले आहे. तसेच पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध करुन देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**किनवट व माहूर तालुका (जि.नांदेड) येथील पशुवैद्यकीय दवाखान्यातील पशुधन विकास अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(३४) २९६७ (२७-०१-२०१५). श्री. प्रदीप नाईक (किनवट) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) किनवट व माहूर तालुका (जि.नांदेड) येथील पशुवैद्यकीय दवाखान्यातील पशुधन विकास अधिकाऱ्यांची पदे गेल्या ५ वर्षापासून रिक्त असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, किनवट तालुक्यातील एकूण १४ पैकी १३ पदे रिक्त असून माहूर तालुक्यातील एकूण ७ पैकी ६ पदे रिक्त असल्याने या परिसरातील आजारी जनावरांना औषधोपचार होत नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पशुवैद्यकीय दवाखान्यात पशुधन विकास अधिकाऱ्यांची नेमणूक करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथराव खडसे (२६-०२-२०१५) :** (१) हे अंशतः खरे आहे.
(२) हे खरे नाही.

किनवट तालुक्यातील १४ पैकी ६ पदे रिक्त आहेत व माहूर तालुक्यातील ७ पैकी ६ पदे रिक्त आहेत. सदरील रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार नजीकच्या पशुधन विकास अधिका-यांना देण्यात येऊन या परिसरातील आजारी जनावरांवर नियमितपणे औषधोपचार करण्यात येत आहे.

(३) पशुसंवर्धन खात्यात रिक्त असलेली पशुधन विकास अधिकारी गट- अ संवर्गाची एकूण ३७२ पदे भरण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मागणीपत्र सादर करण्यात आले असून त्यानुसार आयोगाद्वारे परिक्षा घेण्यात आली आहे. आयोगाकडून शिफारस पात्र उमेदवारांची यादी प्राप्त होताच नांदेड जिल्ह्यातील पशुधन विकास अधिकारी गट -अ संवर्गाची रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाटण तालुक्यातील (जि. सातारा) तारळी धरण प्रकल्पातील**
**मौजे तोंडोशी गावाच्या पुनर्वसनाबाबत**

**(३५) २९७४ (२३-१२-२०१४). श्री. शंभुराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाटण तालुक्यातील (जि. सातारा) तारळी धरण प्रकल्पातंर्गत असणारे मौजे तोडोंशी हे गांव धरण प्रकल्पाच्या बाधित क्षेत्रात वसलेले असून तारळी धरणाच्या मुख्य भिंतीच्या बांधकामापासून सुमारे ३०० फुटावर आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धरणाच्या भिंतीच्या बांधकामामुळे सदर गावांतील घरांना तडे गेले आहेत. त्यामुळे सदर गावांतील ३० कुटुंबाच्या घरांना मोठ्या प्रमाणात भेगा पडल्या असून बऱ्याच घरांची पुर्णत: पडझड झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तोडोंशी गावातील ३० कुटुबांची स्वमालकीची जमीन असून त्या जमीनीमध्ये गावांतील ३० कुटुंबांची स्थलांतर होण्याची तयारी असून त्या कुटुंबानी सध्या रहात असलेल्या घरांचे सध्याच्या बाजारभावाप्रमाणे मुल्यांकन करुन स्थलांतर ठिकाणी पुनर्वसन करण्यास मान्यता देवून घरबांधणीकरीता रक्कम मिळावी अशी अनेक वर्षापासून मागणी करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्य शासनाने याबाबत कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येणार आहे. त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (२७-०१-२०१५) :** (१) हे खरे नाही. तथापि मौजे तोंडोशी हे गाव तारळी धरणाच्या मुख्य भिंतीच्या खालील बाजूस सुमारे १००० फुटावर आहे.

(२) हे अंशतः खरे आहे. मौजे तोंडोशी मधील ४९ खातेदारांच्या ४९ घरांना तडे गेले आहेत.

(३) हे खरे आहे.
(४) तोंडोशी गाव धरणाच्या बुडीत क्षेत्रात येत नसल्याने पुनर्वसन करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तथापि तत्कालीन मा.मंत्री (मदत व पुनर्वसन) यांच्या ०६/०२/२००८ च्या बैठकीतील निर्देशानुसार धरणाच्या कामामुळे नुकसान झालेल्या ४९ घरांच्या नुकसान भरपाईचा प्रस्ताव विभागीय आयुक्तामार्फत शासनास प्राप्त झाला होता या प्रस्तावाबाबत महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे व जलसंपदा विभाग यांच्याशी समन्वय साधून कार्यवाही करण्याचे निर्देश विभागीय आयुक्त, पुणे यांना देण्यात आले आहेत.

---

**पाटण तालुक्यातील (जि.सातारा) पवनऊर्जा प्रकल्पामुळे खराब झालेल्या रस्त्यांना निधी उपलब्ध करुन देणेबाबत**

**(३६) २९७७ (१५-०१-२०१५). श्री. शंभुराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाटण तालुक्यात (जि.सातारा) मोठ्या प्रमाणात उभारण्यात येणा-या पवनऊर्जा प्रकल्पातील कंपन्यानी प्रकल्पाकरिता लागणा-या अवजड साहित्यांची वाहतूक तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्त्यावरुन ने-आण केल्याने सदरचे रस्त्यांचे सुमारे २५ कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तालुक्यातील प्रमुख रस्त्यांची दुरावस्था करुन संबंधित कंपन्यानी नुकसान भरपाई म्हणून जिल्हा परिषद, सातारा यांचेकडे केवळ ३० लाख रुपये नुकसानीची अनामत रक्कम जमा केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्य शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय,
(४) नसल्यास, रस्त्यांचा कंपन्यांनी केलेला वापर, नुकसान झालेल्या रस्त्यांची लांबी व नुकसानीचे अंदाजपत्रक याचा विचार करुन खराब झालेले रस्ते पुर्ववत करण्याकरिता कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१०-०३-२०१५)** :(१) हे अंशतः खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत पाटण तालुक्यातील रु. १४५३.६७ लक्ष इतक्या रकमेच्या ४ रस्त्यांच्या कामांना, महाऊर्जा, पुणे यांनी दिनांक २०.८.२०१४ रोजी मंजुरी दिली असून त्यानुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कामे सुरु आहेत.
तसेच, राज्यातील पवनऊर्जा प्रकल्पाच्या वाहतुकीमुळे बाधित झालेले रस्ते पूर्वस्थितीत आणण्यासाठी शासन निर्णय दिनांक २५.२.२०१५ अन्वये रु. १७.०० कोटी इतका निधी उपलब्ध करुन दिलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाटण (जि.सातारा) वन विभागाच्या क्षेत्रात अनधिकृत**
**पवनचक्की टॉवरची उभारणी केल्याबाबत**

**(३७) २९८३ (२७-०१-२०१५). श्री. शंभुराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाटण (जि.सातारा) वनविभागाच्या हद्दीत राज्यातील तसेच राज्याबाहेरील विविध पवनऊर्जा कंपन्यानी अनधिकृतपणे पवनचक्की टॉवरची उभारणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,अनधिकृतपणे पवनचक्की टॉवरची उभारणी करणाऱ्या कंपन्यांवर राज्य शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२०-०२-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाटण तालुक्यातील कोयना धरणग्रस्तांना पुनर्वसनासह नागरी सुविधा देण्याबाबत**

**(३८) २९८४ (२३-१२-२०१४). श्री. शंभुराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाटण तालुक्यात कोयना धरण असून या धरणामुळे या विभागातील अनेक गावांचे पुनर्वसन झाले आहे त्यातील बहूतांशी गांवाचे पाटण मतदारसंघातच पुनर्वसन झाले आहे परंतु पुनर्वसन झालेल्या या गावातील बाधित धरणग्रस्तांना अद्ययावत सुविधा मिळत नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोयना धरणामुळे बाधित झालेल्या सर्व गावांना अद्ययावत पुनर्वसनासह १८ नागरी सुविधा पुरविण्याचे शासनाने मान्य केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पाटण विधानसभा मतदारसंघातील कोयना धरणग्रस्त बाधितांना त्यांच्या पुनर्वसीत गांवामध्ये सर्व सुविधा तसेच शासनाने ठरवून दिलेल्या १८ नागरी सुविधा अद्यापही मिळत नाहीत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) नसल्यास, पाटण विधानसभा मतदारसंघातील कोयना पुनर्वसनग्रस्त गावांना राज्य शासनाने ठरवून दिलेल्या १८ नागरी सुविधा देणेबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे त्याचे थोडक्यात स्वरुप काय ?

**श्री. गिरीष महाजन (१०-०३-२०१५) :**(१), (२) व (३) हे खरे नाही. पुनर्वसित गावातील बाधित धरणग्रस्तांना महाराष्ट्र प्रकल्प बाधितांचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ नुसार अनुज्ञेय असणा-या ५ वाढीव सुविधांची कामे प्रगतीपथावर आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत  नाही.
(५) कोयना पुनर्वसनग्रस्त गावांना महाराष्ट्र प्रकल्प बाधीतांचे पुनर्वसन अधिनियम १९९९ नुसार १८ सुविधांची कामे अनुज्ञेय ठरविण्यात आली आहेत.

---

**बागलवाडी खालील वाघमोडेवाडी (ता.सांगोले, जि.सोलापूर) येथील प्राथमिक शिक्षकाचा निवडणूक मतदार केंद्रावर झालेला मृत्यु**

**(३९) २९९७ (२३-१२-२०१४). श्री. गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यातील सांगोले तालुक्यातील बागलवाडी खालील वाघमोडेवाडी येथील प्राथमिक शिक्षक म्हणून काम करत असलेले उत्तम महादेव देशमुख हे दिनांक १५ ऑक्टोबर, २०१४ रोजी वेळापूर ता.माळशिरस येथील विधानसभा निवडणूक मतदार केंद्रावर कामावर असताना अचानक प्रकृती स्वास्थ्य बिघडल्याने उपचारासाठी पंढरपूरला जात असतांना मयत झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार मयत व्यक्तीच्या वारसांना निवडणूक आयोग अथवा शासनामार्फत कोणत्या स्वरुपाची मदत करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०१-२०१५) :**(१) होय.
(२) व (३) संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याद्वारे चौकशी करण्यात आली. त्यास अनुसरुन जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, सोलापूर यांनी मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे अनुदान मागणीचा प्रस्ताव सादर केला. सदर प्रस्तावानुसार जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, सोलापूर यांना दिनांक ७.१.२०१५ रोजी रु. १०.०० लक्ष इतके अनुज्ञेय अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले. जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, सोलापूर यांनी सदरचे अनुदान तहसिलदार, सांगोला यांना दिनांक १६.१.२०१५ रोजी वर्ग केले असुन कै. उत्तम महादेव देशमुख यांच्या पत्नी श्रीमती महालक्ष्मी उत्तम देशमुख यांना दिनांक २० जानेवारी, २०१५ रोजी सानुग्रह अनुदान अदा करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उदभवत नाही.

---

**केंद्र शासनाच्या वेगवर्धित सिंचनलाभ योजनेतंर्गत मंजूर केलेल्या सांगोले शाखा कालवा प्रकल्पाच्या कामाबाबत**

**(४०) ३००५ (२३-१२-२०१४). श्री. गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या वेगवर्धित सिंचनलाभ योजनेतंर्गत सोलापूर जिल्ह्यातील सांगोले शाखा कालवा प्रकल्पाच्या १८३.२४ कोटी कामाला सन २००८-०९ साली मंजूरी दिली आहे काय,
(२) असल्यास, त्या कामावर सन २०१४-१५ अखेर केंद शासनाने किती निधी प्रत्यक्ष दिला आहे,
(३) या निधीतून प्रकल्प पूर्ण करुन ६८८३ हेक्टर जमीन पाण्याखाली आणण्याचे उद्दीष्ट ठरविले होते काय,
(४) या प्रकल्पाची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२०-०२-२०१५) :** (१) अंशतः खरे आहे, सांगोला शाखा कालवा प्रकल्प केंद्र शासनाच्या वेगवर्धित सिंचन लाभ कार्यक्रमांतर्गत सन २००७-०८ मध्ये समाविष्ट करण्यात आला आहे.
(२) रु. १३९.०६ कोटी इतके केंद्रीय सहाय्य प्राप्त झाले आहे.
(३) होय
(४) सांगोला शाखा कालवा प्रकल्पाच्या केंद्र शासनाचे वेगवधित सिंचन लाभ योजनेतंर्गत ६८८३ हेक्टर उद्दीष्टा पैकी ३५४६ हेक्टर सिंचन क्षेत्र निर्मिती झालेली आहे. सदर प्रकल्पास सुधारीत प्रशासकीय मान्यता व केंद्रीय जल आयोगाच्या तांत्रिक सल्लागार समितीची सुधारीत मान्यता घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

## नागपूर आरमोरी गडचिरोली राज्य महामार्गावर अनेक वेळा अपघात होवून जिवितहानी होत असल्यामुळे

**(४१) ३०१४ (२२-१२-२०१४). श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी शहरामधुन गेलेल्या नागपूर आरमोरी गडचिरोली राज्य महामार्गावर मोठया प्रमाणात रहदारी वाढली असून अरुंद रस्त्यामुळे अनेक वेळा अपघात व जिवितहानी झालेली असून कायदा आणि सुव्यवस्थेवर परिणाम झालेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ब्रम्हपूरी शहरातील ख्रिच्छनांद हॉस्पिटल समोरील चौकापासून ते रेल्वे क्रॉसिंग पर्यंत २ किमी रस्त्याचे सिमेंटीकरणासह चौपदरीकरण करण्याची मागणी लोकप्रतिनिधींसह नागरीकांनी शासनाकडे वेळोवेळी केली असल्याचे दिनांक २४ नोव्हेंबर,२०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू रस्त्याचे सिमेंटीकरणासह चौपदरीकरणाचे बांधकाम करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच त्यासाठी किती निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-२-२०१५) :**(१) प्रश्नाधीन रस्त्यावर मोठया प्रमाणात वाहतूक वर्दळ वाढली आहे, हे खरे आहे. तथापि, अरुंद रस्त्यामुळे अपघात व जिवितहानी झाल्याची नोंद नाही.
(२) नाही, तथापि, या संदर्भात हिवाळी अधिवेशन सन २०१४ मध्ये अर्धा तास चर्चेची सूचना क्रमांक ६७ उपस्थित झालेली होती.
(३) प्रश्नाधीन रस्त्याचे ब्रम्हपुरी शहरातील कि.मी. ०/०० ते १/०० ख्रिस्तानंद हॉस्पिटल समोरील चौकापासून ते रेल्वे क्रॉसिंगकडे जाणा-या रस्तांच्या चौपदरीकरणाच्या कामाचे कार्यारंभ आदेश देण्यात आले असून, निधी उपलब्धतेनुसार काम पूर्ण करण्याच नियोजन आहे.
(४) सन २०१४-१५ मध्ये रु.५०.०४ लक्ष एवढी तरतुद उपलब्ध आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उपविभागीय अभियंता,गोसीखुर्द प्रकल्प, सिंचाई विभाग, हे मंजूर असलेले कार्यालय सावली येथे तातडीने सुरु करण्याबाबत**

**(४२) ३०२७ (२३-१२-२०१४). श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोसीखुर्द प्रकल्पाचे पाणी आसोला मेंढा तलावाच्या माधमातून सावली (चंद्रपूर जिल्ह्यातील) तालूक्यातील हजारो हेक्टर जमिनीचे सिंचन होणार असल्यामुळे सावली येथे गोसीखुर्द प्रकल्पाचे उपविभागीय अभियंता, गोसीखुर्द प्रकल्प विभाग, सावली हे कार्यालय मंजूर असतांना सुध्दा अद्यापही सुरु झाले नसल्यामुळे तालुक्यातील विकास कामे करण्यास नागरिकांना मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागत असल्याची धक्कादायक माहिती दि. २४ नोव्हेंबर, २०१४ च्या सुमारास निर्देशनास आली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपविभागीय अभियंता,गोसीखुर्द प्रकल्प, सिंचाई विभाग, हे मंजूर असलेले कार्यालय सावली येथे तातडीने सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केलेली आहे वा करण्यात येणार आहे,
(३) नसल्यास, याबाबत होणा-या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२८-०१-२०१५) :** (१) याबाबतचे दिनांक ११.११.२०१४ चे पत्र प्राप्त झालेले आहे.
(२) आसोलामेंढा प्रकल्पासाठी एक उपविभाग दिनांक २६.०२.२०१२ पासून सावली येथे कार्यरत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्ह्यातील सिंदेवाडी येथे कृषी विद्यापीठाच्या २०० एकर जागेवर नवीन कृषी विद्यापीठ स्थापन करण्याबाबत**

**(४३) ३०३० (२२-१२-२०१४). श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंजाबराव कृषी विद्यापीठ, अकोला येथे असल्यामुळे पुर्व विदर्भातील सर्व कृषी महाविद्यालयाच्या प्रशासकीय कामकाजासाठी विद्यार्थ्यासह अधिकारी, कर्मचारी व नागरिकांना अकोला येथे जावे लागत असल्यामुळे आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत असल्यामुळे नागरिकांनी चंद्रपूर जिल्ह्यातील सिंदेवाडी येथे सर्व सोयीसुविधाने युक्त कृषी विद्यापीठाच्या २०० एकर जागेवर नवीन कृषी विद्यापीठ स्थापन करण्याची मागणी लोकप्रतिनिधींसह केली असल्याची माहिती दिनांक २४ नोव्हेंबर, २०१४ च्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चंद्रपूर जिल्ह्यातील सिंदेवाडी येथे कृषी विद्यापीठाच्या २०० एकर जागेवर नवीन कृषी विद्यापीठ स्थापन करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, वा करणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१३-०३-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला व महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी या दोन कृषि विद्यापीठांचे विभाजन करण्याची आवश्यकता आहे किंवा कसे याबाबत शासनास मार्गदर्शन करण्यासाठी डॉ.वाय.एस.पी.थोरात, माजी अध्यक्ष, नाबार्ड यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. सदरच्या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून अहवालावर पुढील कार्यवाही सुरु आहे.

---

**जालना जिल्ह्यातील मौजपुरी पोलीस स्टेशनमधील सहाय्यक पोलीस निरीक्षकाच्या मनमानी कारभाराबाबत**

**(४४) ३१०० (१५-०१-२०१५). श्री. अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्ह्यातील मौजपुरी पोलिस स्टेशनमध्ये कार्यरत असलेले सहाय्यक पोलीस निरीक्षक, श्री. एम.टी. सुरवसे हे खोट्या केसेस दाखल करुन नागरिकांना दलालामार्फत दमदाटी करुन मनमानी कारभार करीत असल्याची तक्रार पोलिस अधिक्षकांकडे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील पो.स्टे. अंतर्गत असलेल्या नागरिकांमध्ये दहशत असून गुन्हेगारीमध्ये वाढ झाली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी काय कारवाई झाली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०३-२०१५)** :(१) माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये नमूद सहायक पोलीस निरीक्षक यांचे विरुध्द पोलीस अधिक्षक कार्यालय जालना येथे तक्रार प्राप्त नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जालना जिल्ह्यातील राजेवाडी साठवण तलावाच्या अपूर्ण व निकृष्ट कामाबाबत**

**(४५) ३१०१ (२३-१२-२०१४). श्री. अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जालना जिल्ह्यातील राजेवाडी साठवण तलाव लघु पाटबंधारे विभाग जालना यांचेकडून सन २००३-२००४ मध्ये मंजूर आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आतापर्यंत अर्धवट काम झाले असून तेही निकृष्ट स्वरुपाचे असल्यामुळे शेतकऱ्यांना अद्याप लाभ मिळाला नसल्याची तक्रार अधिक्षक अभियंता जलसंपदा औरंगाबाद यांचेकडे नागरिकांनी केली, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील साठवण तलावाचे पिचिंग व वळण रस्त्याचे काम अर्धवट आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, संबंधित ठेकेदार व अभियंत्याविरुध्द शासनाने काय कार्यवाही केली अथवा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (१३-०३-२०१५)** :(१) होय.
(२) नाही.
तथापि, याविषयी श्री. अर्जून खोतकर, वि.स.स. यांनी दिनांक २४.१२.२०१४ रोजी मा. मंत्री, जलसंपदा याचेकडे व श्री. भाऊसाहेब घुगे, जालना यांनी दिनांक २३.१२.२०१४ रोजी मा. मंत्री, पाणीपुरवठा यांचेकडे तक्रार केली आहे.
(३) होय.
भुसंपादनाच्या अडचणीमुळे पिंचींगचे जवळपास ४० % काम बाकी आहे. तसेच वळण रस्त्याचे एकूण लांबीपैकी ४५० मी. लांबीतील काम अंशतः बाकी आहे.
(४) पर्यायी वळणरस्ता संरेखे बाबत स्थानिक मतभेदामुळे व भुसंपादनाच्या अडचणीमुळे शेतक-यांनी काम बंद पाडले आहे. भुसंपादनाची अडचण दूर होताच काम तात्काळ सुरु करण्यात येईल त्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**जालना जिल्ह्यातील देवी दहेगांव प्रकल्पासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी संपादन करुनही काही शेतकऱ्यांचे भु-संपादनाचा मावेजा शासनाकडे थकीत असल्याबाबत**

**(४६) ३१०६ (२२-१२-२०१४). श्री. अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्ह्यातील देवी दहेगांव प्रकल्पासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी संपादन केल्या असून अद्याप काही शेतकऱ्यांचा भु-संपादनाचा मावेजा शासनाकडे १५ ते २० वर्षा पासून थकीत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्ह्यातील अनेक प्रकल्पातील प्रलंबित भू-संपादनाबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे,
(३) असल्यास, यातील काही शेतकरी मयत झाले असून त्यांच्या वारसांना थकीत भू-संपादनाचा मावेजा देण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेण्यात आला आहे वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१९-०३-२०१५) :** (१) हे खरे नाही.
मौ.देविदहेगाव प्रकल्पासाठी शेतक-यांच्या भूसंपादनाचा मावेजा शासनाकडे थकीत नाही.
(२) प्रलंबीत भूसंपादनाबाबत नविन भूसंपादन कायदा २०१३ प्रमाणे जालना जिल्ह्यात कार्यवाही सुरु आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शासनाच्या विविध योजनेअंतर्गत जालना जिल्ह्यातील विकासकामे निधी अभावी बंद असल्याबाबत.**

**(४७) ३१०८ (२२-१२-२०१४). श्री. अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाच्या विविध योजनेअंतर्गत जालना जिल्ह्यातील विकास कामे निधी अभावी बंद आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील इतर भागाच्या तुलनेत जालना जिल्ह्यात कमी निधी देण्यात आला हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने याप्रकरणी काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२७-०१-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना करिता शासन निर्णय नियोजन विभाग, दि. १७ /४/२०१० अन्वये निश्चित करण्यात आलेल्या निधी वाटप सूत्रानुसार जिल्ह्यांना नियतव्यय मंजूर करण्यात येतो. त्यानुसार जालना जिल्ह्यास जिल्हा वार्षिक योजना, सन २०१४-१५ करिता रु. १५०.०० कोटी इतका नियतव्यय मंजूर आहे. सबब, जालना जिल्ह्यास इतर भागाच्या तुलनेत कमी निधी दिला असे म्हणता येणार नाही.

---

**पाथरी येथील पाझर तलाव व बंधाऱ्याचे प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत**

**(४८) ३१४६ (२२-१२-२०१४). श्री. मोहन फड (पाथरी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाथरी मतदार संघातील पाझर तलाव व बंधाऱ्याचे किती प्रस्ताव शासनाकडे माहे मार्च २०१४ अखेर प्रशासकीय मान्यतेसाठी प्रलंबित आहेत व किती प्रस्तावांना मान्यता देण्यात आली,

(२) तसेच मंजुर झालेल्या किती पाझर तलाव व बंधा-याचे कामे सुरू आहेत,

(३) उक्त कामाकरीता एकुण किती निधी खर्च केला व किती निधीची आवश्यकता आहे,

(४) उक्त निधी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२०-०२-२०१५) :** (१) व (२) पाथरी विधानसभा मतदार संघातील पाथरी, सोनपेठ व मानवत या तालुक्यातील कोणतेही प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी शासनाकडे प्रलंबित नाहीत. सिमेंट साखळी बंधारा योजना टप्पा क्रमांक ३ अंतर्गत २४ कामांना मान्यता देण्यात आली आहे. यातील २० कामे पूर्ण झाली असून ४ कामे प्रगतीपथावर आहेत, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद मार्फत मंजूर ९ योजनांची निविदा कार्यवाही प्रगतीत आहे. जिल्हा परिषद, परभणी अंतर्गत जिल्हा नियोजन समितीची मान्यता असलेली ११ कामे व रोजगार हमी योजनेअंतर्गत पाझर तलावाचे एक काम अशी एकूण १२ कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) व (४) प्रगतीपथावर कामांवर रुपये ४०२.६६ लक्ष निधी खर्च झालेला असून रुपये १९४.४७ लक्ष निधीची आवश्यकता आहे. महामंडळामार्फत मंजूर कामे अंतिम करण्यासाठी रुपये ४१९.२५ लक्ष निधीची आवश्यकता आहे. तसेच साखळी बंधारा कामांसाठी निधी उपलब्ध करुन देण्यात देण्यात आला आहे.

---

**मंगरुळ (ता.मानवत, जि.परभणी) येथील जायकवाडी सिंचन शाखा कार्यालयात किंमती साहित्याची चोरी झाल्याबाबत**

**(४९) ३१४८ (१५-०१-२०१५). श्री. मोहन फड (पाथरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगरुळ (ता.मानवत, जि.परभणी) येथील जायकवाडी सिंचन शाखा कार्यालयात रु. ७० हजार किंमतीच्या साहित्याची चोरी झाल्याची तक्रार दिनांक २८ ऑक्टोबर, २०१४ रोजी मानवत पोलीस स्टेशनला देण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याबाबत तपास करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार किती जणांना अटक करण्यात आली वा अटक केलेल्यांकडून किती रक्कमेचा ऐवज हस्तगत करण्यात आला व त्यांचेवर काय कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०३-२०१५) :**(१) प्रश्नात नमूद केल्याप्रमाणे दि. २९/१०/२०१४ रोजी एकूण रु. ६९,०५० /- किमतीचा माल चोरी झाल्याबाबत पोलीस ठाणे मानवत येथे गु.र.नं. १४५/२०१४ कलम ४५७,३८० भा.द.वि. प्रमाणे गुन्हा दाखल आहे.
(२) व (३) सदर गुन्हयाचा वेळोवेळी तपास करण्यात आला तथापि आरोपी निष्पन्न झालेले नाहीत त्यामुळे सदर गुन्हयात 'अ' वर्गात अखेर अहवाल क्र.५६/१४ दि. १२/१२/२०१४ अन्वये पाठविण्यात आला आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

**मुंबई येथील साने गुरुजी मार्ग स्थित नळवाला**
**चाळ क्र. १, २ व ३ या इमारतीच्या पुनर्विकासबाबत**

**(५०) ३१५४ (२३-१२-२०१४). श्री. सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई येथील साने गुरुजी मार्ग स्थित नळवाला चाळ क्र,१, २ व ३ या इमारती अतिधोकादायक झाल्याने दिनांक ७ ऑक्टोबर, २००६ रोजी म्हाडाने भूसंपादीत केल्या असून आजमितीपर्यंत सदरहू इमारतींच्या पुनर्बांधणीचे काम सुरु करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू इमारतींच्या पुनर्बांधणीचे काम किती कालावधीत पूर्ण होणे अपेक्षित आहे,
(३) नसल्यास, सदरहू इमारतींच्या पुनर्बांधणीच्या कामास होत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (१२-०३-२०१५) :**(१) होय.
(२) व (३) म्हाडाने केलेल्या भुसंपादनाच्या अनुषंगाने सदर कामाकरीता दि. ३१.१०.२००७ रोजी निविदा उघडण्यात येवून निम्नतर ठेकेदारास काम देण्यात आले. तथापि, दरम्यानच्या कालावधीमध्ये जमिनीच्या मुळ मालकांनी भुसंपादनाच्या विरोधात दाखल याचिका मा.उच्च न्यायालयामार्फत दि. २०.०७.२०१० रोजी फेटाळण्यात आली. तोपर्यंत ठेकेदाराचा वैधता कालावधी संपल्याने / तांत्रिक कारणास्तव तसेच रहिवाशांनी दि. ८.१.२०१० च्या पत्राद्वारे इमारतीचा पुनर्विकास खाजगी विकासकामार्फत करण्याबाबत विनंती केल्याने सदर प्रकरणी पुढील कार्यवाही होऊ शकली नाही. दरम्यानच्या कालावधीत म्हाडाद्वारे भुसंपादित केलेल्या इमारतींचा पुनर्विकास म्हाडाद्वारे करण्याचा ठराव म्हाडा प्राधिकरणाच्या २५१ च्या बैठकीमध्ये

दि. २४.१०.२०१३ रोजी घेण्यात आला व त्यानुसार सदर इमारतीच्या पुनर्विकासाकरीता दि. २१.१०.२०१४ रोजी आशयपत्र देण्यात आले असून पुढील दोन वर्षाच्या कालावधीत इमारतीची पुनर्बांधणी होणे अपेक्षित आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.